**श्रीमान एस. एस. माने गुरुजी** (सेवानिवृत्त शिक्षक)
ज्ञानवर्धिनी माध्यमिक विद्यालय माकणी (थोर),
ता. निलंगा, जि. लातूर.



**“श्री. श्रीरंग सिताराम माने (गुरुजी)**
**जन्म – मु.पो. देवणी**
**ता. देवणी (पुर्वीचा तालुका उदगीर)**
**जि. लातूर महाराष्ट्र.”**

✍ “माकणी थोर गावच्या जडणघडणीमध्ये अनेकांचे योगदान लाभले. त्यात प्रामुख्याने स्व. संग्रामजी माकणीकर (महसुल, शिक्षण व पुनर्वसन राज्यमंत्री), स्व. दौलतरावजी येळीकर (तत्कालिन मराठवाडा विद्यापीठाचे परिक्षा नियंत्रक), स्व.मारुतीराव आकडे (व्यवस्थापक लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक) स्व. रायभोगे गुरुजी (राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक, जि.प. प्रा. शाळा माकणी) अशी स्वच्छ आचरणाची, कल्याणकारी आदर्श माणसं या भूमीत घडली. यासह माकणी गावच्या जडणघडणीत अनेक व्यक्तीमत्वांचा समावेश होतो. त्यापैकीच

ज्ञानवर्धिनी माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक म्हणजे श्री. श्रीरंग सिताराम माने अर्थातच माने गुरूजी.

✍ “माने गुरूजी यांचा जन्म देवणी या गांवी दिनांक 22 फेब्रुवारी 1951 रोजी झाला. देवणी हे गांव देवणी प्रजातीच्या वळुसाठी प्रसिध्द आहे. अशा गावामध्ये शेतकरी कुटुंबात गुरूजींचा जन्म झाला. त्यांचे पहिले ते आठवी पर्यंतचे शिक्षण जिल्हा परिषद शाळा देवणी येथून झाले. माध्यमिक शिक्षण जळकोट ता. जळकोट (पुर्वीचा तालुका उदगीर) जि. लातूर येथून झाले. पुढील उच्च शिक्षण एम.एस्सी. बी.एड. सायन्स कॉलेज नांदेड येथून झाले.”

✍ “उच्च शिक्षणानंतर ज्ञानवर्धिनी माध्यमिक शाळा माकणी येथे शिक्षक म्हणून दिनांक 01 जुलै 1976 रोजी गुरूजी रुजु झाले. नव्यानेच सुरु झालेल्या या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना घडविणे ही मोठी जबाबदारी शिक्षक वर्गावर होती. माने गुरूजी माकणी येथेच घर करुन वास्तव्यास राहीले. त्यांची विज्ञान व इंग्रजी या विषयांवर चांगली पकड होती. माकणी येथील विद्यार्थ्यांना इंग्रजीच्या पहिल्या मुळाक्षराची ओळख माने गुरूजींकडून झाली. त्यांनी इंग्रजी व विज्ञान हे विषय विद्यार्थ्यांना सोप्या पध्दतीने शिकविले. या विषयात त्यांचा विशेष अभ्यास हातखंडा होता. विज्ञानामध्ये विशेष करुन जीवशास्त्रावर त्यांनी मोठी पकड होती.”

✍ “शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांवर व्यक्तीगत लक्ष ठेऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या घरच्या साधारण परिस्थीतीची जाणीव करुन देऊन शिक्षणातूनच उध्दार असल्याचे पटवून देत. यासोबतच पाल्याच्या सुध्दा संवाद ठेवुन गुरुजींनी शिक्षणाबरोबरच सामाजिक दायित्व खऱ्या अर्थाने निभावले. त्यामुळे विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यावर गुरूजींचा विशेष प्रभाव राहीला. आईवडीलांसोबत गुरूजींचा संवाद असल्याने गुरूजींपासून कोणतीही गोष्ट विद्यार्थ्यांना लपवता येत नसे. सर्वात महत्वाचे म्हणजे वेळेला अतिशय महत्व देणारे, स्वत: शिस्तीत राहणारे, सतत आपल्या कार्यात मग्न असणारे शाळेतील नेमस्त शिक्षक म्हणजेच माने गुरूजी. ज्ञानार्जन, स्तके वाचन, सामाजिक कार्य आणि उत्तम शेती हे त्यांचे आवडीचे विषय.”

✍ “इंग्रजी विषय हा तसा आकलनास अवघड व ग्रामीण मुलांसाठी नावडता विषय. परंतु गुरूजींच्या शिकवणीच्या हातोटीमुळे इंग्रजीविषयीची भिती व त्याचे आकलन सोपे व सुलभ झाले. त्यामुळे ग्रामीण मुलांना या विषयाची आवड निर्माण झाली व गोडी लागली. शिक्षणाची विशेष आवड असलेले विद्यार्थी शाळेच्या वेळेव्यतिरिक्त गुरूजींच्या घरी सुध्दा शिकत गेले. त्यासाठी गुरुजींनी कधीच नकार दिला नाही किंवा वेळेचे बंधन पाळले नाही. यामध्ये माने काकुंनी सुध्दा कधी नकारात्मकता दर्शविली नाही. गुरूजीच्या या कार्यामध्ये त्यांनी सदैव साथ दिली.”

✍ "माकणीच्या शाळेचा उद्देश हा पंचक्रोशीतील सामान्यांची मुले शिकावीत, या शिक्षणाच्या उद्देशाला धरुन शाळेमध्ये दहावीच्या वर्गासाठी रात्रीची शिकवणी सुरु करण्यात आली. त्याकाळी घरोघरी दिवाबत्तीची सोय नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेमध्येच रात्रीच्या शिक्षणाची सोय करुन देण्यात आली होती. त्यामुळे दहावीची मुले रात्री मुक्कामी शाळेतच असायची. गणित, इंग्रजी, विज्ञान हे अवघड विषय रात्रीच्या वेळी सुध्दा शिकवले जायचे. रात्री शाळेवर जणू गस्त घातल्यासारखे शिक्षकांची नजर असायची. शिक्षक हा 24 तास विद्यार्थ्यांच्या शिकवणीत असायचा. त्यात विज्ञान आणि इंग्रजीची जबाबदारी श्रीमान माने गुरुजींची होती. शाळेच्या नियमित वेळेव्यतिरिक्त अतिरिक्त तास घेऊन निशुल्क शिकवणी देण्याचे कार्य आजतागायत सुरु आहे."





✍ "गुरुजींचा स्वभाव कडक शिस्तीचा होता. तो नोकरीच्या शेवटपर्यंत तसाच राहीला. त्यामूळे प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात गुरुजींच्या शिस्तीची छाप कायम राहीली. गुरुजींचे बरेच विद्यार्थी सेवानिवृत्त झाले आहेत परंतु गुरूजी समोर आल्याबरोबर आजही ते मान झुकवुन गुरूजींचा आदर करतात. गुरूजींनी हा जो आदर

मिळविला आहे तो त्यांच्या जन्मभराच्या वर्तणूकीतून मिळविला आहे. ते कधीच अनावश्यक बोलत किंवा वेळेचा अपव्यय करत नसत. सतत अध्ययन करणं, आपल्या शिस्तीमध्ये कधीच तडजोड न करणे व निर्व्यसनी राहणे याबाबत ते कायम दक्ष राहीले. गुरुजींच्या या आचरणामुळे विद्यार्थ्यांचे सुध्दा आचरण कायम चांगले राहीले. विद्यार्थी मुले वाईट वळणावर गेले नाहीत. गुरूजींनी माकणी व परिसरातील दोन पिढया घडविल्या. गुरूजींनी विद्यार्थ्यांना शिस्त लावण्यास कधीच छडीचा आधार घेतला नाही. त्यांच्या शब्दात छडीपेक्षाही मोठी ताकद होती. ते विद्यार्थ्यांवर कधीच मोठया आवाजात रागावले नाहीत परंतु त्यांचा मवाळ आवाजच शिस्त लावणारा होता. त्यांच्या व्रतस्थ वागणुकीमुळे गुरूजींचा आदर कधीच कमी होऊ शकत नाही.”





✍ “त्यांच्या शेवटच्या सेवाकाळात शेवटचे 07 महिने मुख्याध्यापक भुषविले. तथापि, एवढया कमी काळाची त्यांनी शाळेमध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रम व शैक्षणिक उपक्रम राबवून आपल्या कार्याची छाप उमटवली. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या

व्यक्तीगत कलागुणांना वाव मिळण्यासाठी शिक्षणबाहय सांस्कृतिक कार्यक्रम घेतले. विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांचा सहभाग, विद्यार्थ्यांतील क्रिडा कौशल्य ओळखून त्या त्या खेळामध्ये विद्यर्थ्यांन खेळाची संधी उपलब्ध करुन दिली, भाषण कौशल्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन दिले, शाळेमध्ये कवी संमलनाचे आयोजन करुन विद्यर्थ्यांचा दृष्टीकोन घडविण्याचे काम केले. सोबतच संगीत रजनीचा कार्यक्रम असो किंवा कला गुणांचा अभिनय असो यात विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेतलेच परंतु गावातील नागरिकांना सुध्दा त्यांच्यातील कौशल्य व कला असणाऱ्या लोकांना या शालेय उपक्रमात सहभागी करुन एक वेगळेपण निर्माण केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना गावातील लोकांविषयी व लोकांना शाळेविषयी आपुलकी निर्माण होऊन स्नेहबंध निर्माण झाला.

✍ “गुरूजींनी क्रिडा प्रकारातील अनेक खेळांना प्रोत्साहन दिल्यामुळे मुले राज्यस्तरापर्यंत पोहोचली. त्यात क्रिडा शिक्षक आणि खेळाडु विद्यार्थी यांनी चमकदार कामगिरी केली. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या भावी जीवनावर झाला. शाळेच्या विद्यार्थ्यांनी पोलीस उपनिरिक्षक, पोलीस यासह अन्य क्षेत्रात यश मिळविले.”

✍ “दिनांक 28 नोव्हेंबर हा दिवस स्वर्गीय संग्रामजी माकणीकर (माजी शिक्षण, महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) यांचा

स्मृती दिन. या स्मृतीदिनानिमीत्त माने गुरुजींनी संग्राम स्मृती सप्ताहचे आयोजन केले. यामध्ये रक्तदान शिबीर, क्रिडा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, शामची आई- माझी आई या विषयावर प्रा. शाम आगळे यांचा कार्यक्रम, वात्रटिकाकार भारत सातपुते यांचा कार्यक्रम, शाम कोळी यांचा सर्प प्रदर्शनाचा कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना वेगवेगळया विषयांची ओळख करुन दिली.”

✍ “माकणी येथील शाळेत त्यांची एकूण 32 वर्षांची सेवा घडून आली. त्यामध्ये दोन पिढया गुरुजींच्या हाताखाली शिकल्या. जे विद्यार्थी होते तेच पुढे पालक म्हणून गुरुजींच्या सानिध्यात आले. शिक्षक व पालक यांचा समन्वय असावा यासाठी मुख्याध्यापक पदाच्या कालावधीत गुरूजींनी गावातील नागरिक व शिक्षक यांची संयुक्त शिक्षक पालक संघाची स्थापना केली. त्यामधून पालकांच्या समस्या शिक्षकांना आणि मुलांप्रती शिक्षकांची मते पालकांना समजावीत यांचा प्रयत्न केला.”

✍ “ माने गुरुजींनी त्याच्य बुध्दीमत्तेने, त्यांच्या ज्ञानार्जनाने, व्यक्तीगत वर्तनाने व आपल्या शिस्तबध्द जीवनाने विद्यार्थ्यांमध्ये एक आदर्श निर्माण केला. गुरुजी एका शेतकरी कुटुंबात जन्माला आले आणि माकणीसारख्या एका छोटयाशा खेडेगांवात नोकरी करुन अनेक विद्यार्थी घडविण्याची परंपरा निर्माण केली. त्यांचे अनेक विद्यार्थी शासकीय कार्यालये, महामंडळात मोठया हुद्दयावर

गेले. व्यवसायामध्ये यशस्वी झाले ही गुरुजींसाठी सुध्दा गौरवाची बाब आहे.”



✍ **“हनूमान हे माकणीचे आराध्य दैवत आहे. माकणीच्या हनुमानाच्या आराधना प्रसिध्द आहेत. गुरुजींनी सुध्दा हनुमानाप्रती असलेल्या श्रध्देने आराधना संकल्प करुन माकणी वासियांच्या जीवनाशी एकरुप झाले.”**

✍ “ज्ञानवर्धिनी माध्यमिक शाळेमध्ये 32 वर्षाची सेवा बजावून ते 28 फेब्रुवारी 2009 मध्ये सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीच्या समारंभाचे वेळी गुरूजींच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्याप्रती असलेल्या भावना शब्दरुपाने मांडल्या. एका चिमुकलीने आपल्या भाषणात वर्णन केले की, गुरूदक्षिणा म्हणून एकलव्यांचा अंगठा कापून घेणारे गुरु आम्हाला नकोत. आम्हाला विद्यार्थ्यांचे कल्याण व्हावे अशी विचारसणी असणारे श्रीमान माने गुरूजी यांच्यासारखे शिक्षक हवेत. त्यावरुनच गुरुजींच्या शिक्षणाचे कार्य लक्षात येते.”





✍ “ माने गुरूजींवर एकूण सेवाकाळ श्री. जे.डी. कदम गुरूजी यांच्या मुख्याध्यापक पदाच्या कार्यकाळात गेला. त्यामध्ये त्यांना त्यांच्यासह खलंगरे गुरूजी, मरे गुरूजी राजमाने गुरूजी, भोसले गुरूजी, बिराजदार गुरूजी, वाघचौरे गुरूजी, बोथीकर गुरूजी हे सहकारी म्हणून लाभले. हे सर्वच शिक्षक त्यांच्या विषयात पारंगत होते. म्हणून या सगळयांचीच छाप सर्व विद्यार्थ्यांवर होती. त्याचवेळी श्री. डी.डी. सूर्यवंशी यांनी अल्प काळासाठी आपल सेवा दिली. शाळेसाठी जेवढे कष्ट गुरूजन वर्गानी घेतले तेवढेच कष्ट शाळेचे सेवक वसंतमामा सूर्यवंशी, हरिमामा कांबळे, काकडे मामा, मारुती बोरफळे यांनी घेतले. ”

✍ “सद्यस्थितीत गुरूजींचे वय आजरोजी 73 वर्षे असुन त्यांच्या मुळ गांवी वास्तव्यास आहेत. त्यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे आपली प्रकृती सांभाळली असून आवडीने शेतीसाठी वेळ देत आहेत. त्यासोबतच मंदीराच्या दर्शनाच्या व गावच्या अनेक कार्यक्रमाच्या निमित्ताने माकणी गावचा त्यांचा सतत संपर्क असून त्यांच्या सेवेच्या पहिल्या वर्षापासून ते शेवटच्या वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांना ते आजही नावाने ओळखतात. माकणी गावाला आजही गुरुजींचा तेवढाच आदर व सन्मान आहे. ”

✍ “माकणी गांव व संस्थेबद्दल गुरूजींच्या भावना या खूप आपुलकीच्या प्रेमाच्या आहेत. गावातील सामाजिक व सांस्कृतिक व त्यांना लाभलेल्या सहकार्याबद्दल ते कृतज्ञ आहेत. ग्रामविकास मंडळाच्या ज्ञानवर्धिनी माध्यमिक शाळेच्या संस्थेने दिलेल्या सहकार्य व संधीबद्दल सुध्दा ते तत्कालिन कार्यकारी संचालक मंडळातील प्रत्येकांबाबत आभार व्यक्त करतात. मुख्याध्यापक काळामध्ये त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे काम करण्याची मुभा दिल्याबद्दल त्यांनी संस्थेचे अध्यक्ष प्रा. सतिषराव सूर्यवंशी यांचे विशेष आभार मानले. यात विशेष असे की, सतिष सूर्यवंशी हे त्यांचे विद्यार्थी असून कालांतराने संस्थेचे अध्यक्ष झाले. यात माने गुरुजींना त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे काम करण्याची मुभा दिल्याबद्दल ही एका शिष्याकडून गुरुला दिलेली भेट आहे अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या. एका विद्यार्थ्याप्रती अशा प्रकारची भावना व्यक्त करणे हाच गुरूजींच्या मनाचा मोठेपणा आहे.”

✍ “गुरुजींना तीन मुली व एक मुलगा असे चार आपत्य आहेत. त्यातील दोन मुली डॉक्टर आहेत. एक मुलगी शिक्षिका आहे व मुलगा स्पर्धा परिक्षेची तयारी करीत आहे.”

✍ “गुरूजींच्या सेवाकाळातील मुख्याध्यापक व तत्कालिन सहकारी शिक्षक बंधू यांचा काळ हा माकणी गांव विकासाचा व

शिक्षण विकसनाचा सुवर्णकाळ राहीला आहे. त्यामुळे माकणी गावच्या अनेक पिढयांना माने गुरूजींसहीत शाळेतील समकालीन शिक्षकांचा आदर व सन्मान कायम राहील. त्याप्रत सर्व विद्यार्थ्यांकडून गुरूजींप्रती शब्दरुपाने कृतज्ञता व्यक्त करु या."

**लेखन व शब्दांकन : माधव सूर्यवंशी, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**

**विशेष आभार : भगवान माकणीकर, पूणे.**
**तुकाराम सूर्यवंशी, माकणी.**